महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ५६ /२०२५ दि. २८/०३/२०२५

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, नारपोली वाहतूक उपविभागाचे हद्दीत एम.एम.आर.डी.ए. तर्फे ॲफकॉन इन्फ्रास्ट्रेचर लिमिटेड यांचेकडुन अंजुर चौक ते अंजुर फाटा या ठिकाणी असलेले पीलर नं ३२६ ते ३३२ या ठिकाणी लोखंडी गर्डर टाकण्याचे काम दि. ०१/०४/२०२५ रोजी रात्री २२.०० वा. ते दि.०२/०४/२०२५ सकाळी ०६.०० वा. तसेच व दि.०२/०४/२०२५ रोजी रात्री २२.०० वा. ते दि.०३/०४/२०२५ सकाळी ०६.०० वा. पर्यंत करण्यात येणार आहे. सदर काम करतेवेळी अंजुर चौक ते अंजुर फाटा अशा दोन्ही वाहिनीवरील वाहतुक पुर्णपणे १०० टक्के बंद करण्याची करावी लागणार आहे. त्यामुळे नमूद मार्गावर दैनंदिन वाहतुकीबरोबर अतिरिक्त जड अवजड वाहनांची वाहतुक सुरू राहिल्यास वाहतूक कोंडीचा प्रश्न निर्माण होवू शकतो. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

| | |
|---|---|
| प्रवेश बंद – | १) नवी मुंबई कडुन मुंब्रा माणकोली मार्गे गुजरात कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना कळवा वाहतूक विभागाच्या हद्दीत 'गॅमन जंक्शन' येथे 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे. |
| पर्यायी मार्ग – | सदर वाहने कळवा वाहतुक उपविभाग हद्दीतुन गॅमन जंक्शन–खारेगांव टोलनाका–कापुरबावडी सर्कलवरून घोडबंदर मार्गे गुजरातकडे इच्छित स्थळी जातील. |
| प्रवेश बंद – | २) मुंबई कडुन माजीवाडा वाय जंक्शन माणकोली मार्गे गुजरातकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना कापुरबावडी वाहतुक उपविभाग हद्दीत 'माजीवाडा वाय जंक्शन' येथे 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे. |
| पर्यायी मार्ग – | सदर वाहने कापुरबावडी वाहतुक उपविभाग हद्दीत 'माजीवाडा वाय जंक्शन' येथुन डाव्या बाजुने वळण घेवुन कासारवडवली घोडबंदर रोडने गुजरातकडे इच्छित स्थळी जातील. |
| प्रवेश बंद – | ३) मुंबई व नवी मुंबईकडुन बाळकुम नाका, अंजुर फाटा मार्गे गुजरात/भिवंडीकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनाना कापुरबावडी वाहतुक उपविभाग हद्दीत 'बाळकुम नाका' येथे 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे. |
| पर्यायी मार्ग – | गुजरातकडे जाणारी सर्व प्रकारची वाहनाने बाळकुम नाका येथे यु टर्न घेऊन कापुरबाबडी सर्कल मार्गे घोडबंदर रोडने जातील व भिवंडी कडे जाणारी वाहने बाळकुम नाका येथे यु टर्न घेऊन माजीवडा जंक्शन मार्गे भिवंडीकडे जातील. |
| प्रवेश बंद – | ४) गुजरातकडुन चिचोंटी नाका मार्गे नारपोली वाहतुक उपविभाग हद्दीत अंजुर फाटा मार्गे नाशिक/मुंबई–नवी मुंबई कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनाना 'चिचोंटी नाका' येथे 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे. |
| पर्यायी मार्ग – | सदरची वाहने चिचोंटी नाका–गायमुख–फाऊटंन हॉटेल मार्गे घोडबंदर रोडने माजीवाडा जंक्शनने कापुरबावडी वाहतुक उपविभाग हद्दीतुन इच्छित स्थळी जातील. |
| प्रवेश बंद – | ५) भिवंडी वाहतुक उपविभाग येथुन नारपोली वाहतुक उपविभाग हद्दीत अंजुर फाटा मार्गे मुंबई व गुजरातकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना भिवंडी वाहतुक उपविभाग हद्दीत 'कल्याण नाका' येथे 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे. |
| पर्यायी मार्ग – | सदर वाहने कल्याण नाका मार्गे –अशोक नगर–भादवड नाका–रांजनोली नाका मार्गे–कोनगांव वाहतुक उपविभाग हद्दीतुन इच्छित स्थळी जातील. |

CamScanner

| | |
|---|---|
| प्रवेश बंद – | ६) नाशिककडुन गुजरातकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना 'वडपे नाका' येथे 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे. |
| पर्यायी मार्ग – | सदर वाहने ही वडपे नाका – भिवंडी – वाडा मार्गे इच्छित स्थळी जातील. |

सदर अधिसूचना दि.०१/०४/२०२५ रोजी रात्रौ २२.०० वा. ते दि.०२/०४/२०२५ सकाळी ०६.०० वा. तसेच व दि.०२/०४/२०२५ रोजी रात्रौ २२.०० वा. ते दि.०३/०४/२०२५ सकाळी ०६.०० वा. पर्यंत रोजीपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण.
मा. आयुक्त, भिवंडी निजामपुरा शहर महानगरपालिका, भिवंडी/बृहन्मुंबई
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–२/वि.शा.ठाणे.

**प्रत कार्यवाहीसाठी :–**

प्रादेशिक परिवहन अधिकारी भिवंडी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, भिवंडी
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, भिवंडी
नियंत्रण कक्ष अधिकारी, भिवंडी/ठाणे.
**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.
**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.
**प्रत** :– सपोआ वाहतूक विभाग, भिवंडी व पो.निरी. भिवंडी, नारपोली, कोनगांव वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.

CamScanner